## अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

सचिव कार्यालय
दिनांकः- २३/१०/२००८

**प्रति,**
मा. -------------------------------------
स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसुची 'ड' प्रकरण २ नियम ३(क) अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा **क्र.१३ शुक्रवार दिनांक २४/१०/२००८ दुपारी १.००** वाजता स्थायी समिती कार्याल्यात खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- १३**

**सन-२००८-२००९**

**शुक्रवार दिनांक.- २४/१०/२००८ ची विषय पत्रिका.**

**विषय क्रं.** **विषय**

१. अहमदनगर महानगरपालिकेचे **यु.आय.डी.एस.एस.एम.टी.**योजने अंतर्गत केडगाव प्रभागांसाठी चे पाणी पुरवठा योजने कामी सी.आय. (C.I) पाईप खरेदी करितां मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दर धारक यांचे कडून त्यांनी निगोशिएशन करून दिलेल्या कमीचे दराने **किंवा** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ यांचे कडून त्यांचे रेट कॉन्ट्रॅक्ट (हॅन्डलींग चार्जेससह)नुसार खरेदी करणे अशा बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव.

१. अहमदनगर महानगरपालिकेचे **यु.आय.डी.एस.एस.एम.टी.**योजने अंतर्गत केडगाव प्रभागांसाठीचे पाणी पुरवठा योजनेच्या आर.सी.सी., एम.बी.आर. गुरूत्व वाहिनी अंथरणे,जोडणे इत्यादी कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दरास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत**- १) मा. राज्य निवडणुक आयोग, यांचे दि. २० ऑक्टोंबर २००८ चे पत्र.
२) विषय-क्रमांक १ ते २ च्या प्रस्तावांच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१३**
सन २००८-२००९

विषय क्रमांक- १ शुक्रवार दिनांक २४/१०/२००८

ठराव क्रमांक - १ शुक्रवार दिनांक २४/१०/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे **यु.आय.डी.एस.एस.एम.टी.** योजने अंतर्गत केडगाव प्रभागांसाठी चे पाणी पुरवठा योजने कामी सी.आय. (C.I) पाईप खरेदी करितां मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दर धारक यांचे कडून त्यांनी निगोशिएशन करून दिलेल्या कमीचे दराने **किंवा** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ यांचे कडून त्यांचे रेट कॉन्ट्रॅक्ट (हॅन्डलींग चार्जेससह)नुसार खरेदी करणे अशा बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव.

**प्रस्तावाचा मजकूर** :-प्रस्तावना-विषय- UIDSSMTअंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील केडगाव प्रभागासाठी पाणी पुरवठा योजनेच्या कामी सी.आय. पाईप खरेदी करणे कामी प्राप्त झालेल्या निविदा दरास मा.स्थायी समितीची मंजूरी मिळणे बाबत.

**टिप्पणी :**उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट सादर की , UIDSSMT अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील केडगाव प्रभागासाठी पाणी पुरवठा योजनेकामी डी.आय.व सी.आय.पाईप खरेदी करणेबाबत स्वंतत्र जाहिर निविदा मागविण्यात आल्या होत्या. **सी.आय.पाईप्स** खरेदी कामी एकूण दोन वेळा जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आलेल्या होत्या. फेर निविदेच्या वेळेत व मुदतीत खालील दोन निविदाधारकांनी सिलबंद निविदा दि.२/९/०८ रोजी सादर केल्या.

१) मे.केशारी ॲण्ड कंपनी , मुंबई
२) मे.विद्यां ट्रेडर्स , मुंबई

वेळेत व मुदतीत प्राप्त वरील निविदाधारकांच्या सिलबंद निविदा दि.२/९/०८ रोजी निविदांधारकां समोर उघडल्या असता मे.केशारी ॲण्ड कंपनी यांचे दर तुलनात्मक दृष्टया कमीचे होते.त्यामूळे कमीचे निविदाधारक मे. केशारी ॲण्ड कंपनी यांचे कमीच्या प्राप्त दरांची **D.P.R , CS.R , M.J.P. R C** यातील दरांशी तुलना करण्यात आली .

| **Sr No.** | **Discription** | **Estimated Cost in Rs.** | **Tender Cost in Rs.** | **% Above** |
|---|---|---|---|---|
| **1** | **As Per D.P.R** | **4,16,81,776** | **10,12,26,036** | **143%** |
| **2** | **As Per C.S.R** | **6,19,66,734** | **10,12,26,036** | **63%** |
| **3** | **As Per M.J.P.R C** | **9,03,64,527** | **10,12,26,036** | **12%** |

वरील प्राप्त कमीचे निविदा दर धारक केशारी ॲण्ड कंपनी, मुंबई यांनी भरलेल्या निविदा दरांचा वरीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता पाहता सदरचे दर हे अंदाजपत्रकीय रक्कम, सन २००७ -०८ ची दरसूची तसेच नविन दर करार नुसार जादाचे आलेले असल्याने , दि.९/९/०८ रोजी मा.आयुक्त यांचे दालनात निविदा समितीची बैठक घेण्यात येउन सदर बैठकीत मे. केशारी ॲण्ड कंपनीच्या प्रतिनिधींनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 'दर करार + ५%' सेवाशुल्क मिळून येणा-या एकूण रक्कमेपेक्षा ०.१ % कमी दराने म्हणजेच 'दर करार + ४.९%' या दराने करणेस सहमती दर्शविली व त्यानुसार संबंधित निविदाधारक यांनी दि.१०/९/०८ रोजीच्या पत्रान्वये खालील प्रमाणे निविदा दराबाबत लेखी पत्र दिलेले आहे.

१) १५० एम.एम. व्यासाची सी.आय.पाईप - २२१४४ मी. निविदा दर- रू.२१३६/-प्रति मी.
वाटाघाटीनंतरचे प्राप्त दर- रू.२०१४.९५/- प्रति.मी.
२) १०० एम.एम. व्यासाची सी.आय.पाईप- ३८५७४ मी. निविदा दर-रू.१३९८/- प्रति मी.
वाटाघाटीनंतरचे प्राप्त दर - रू.१३००.९०/- प्रति.मी.

वरीलप्रमाणे वाटाघाटी करून कमी करून दिलेल्या दरांची **D.P.R , CS.R , M.J.P. R C** यातील दरांशी तुलना पुढील प्रमाणे होत आहे.

| Sr No. | Discription | Estimated Cost in Rs. | Tender Cost in Rs. | % Above |
|---|---|---|---|---|
| 1 | As Per D.P.R | 4,16,81,776 | 9,47,99,969 | |
| 2 | As Per C.S.R | 6,19,66,734 | 9,47,99,969 | |
| 3 | As Per M.J.P.R C | 9,03,64,527 | 9,47,99,969 | 4. 9 % |

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करणेबाबतच्या सादर प्रस्तावामध्ये मा. मुख्य लेखाधिकारी , मा.उपायुक्त, व मा.आयुक्त साहेब यांनी निविदाधारक मे. केशारी ॲण्ड कंपनी,मुंबई यांनी निगोशिएशन केलेले दर हे M.J.P. R C पेक्षा ४.९ % जादाचे आलेले आहे. त्यामूळे सदर पाईप मा. सर्व साधारण सभा ठराव क्र. ६, दि. १२/५/२००८ अन्वये पारीत ठरावानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ यांचेकडून त्यांचे Rate Contract (Handling Charges सह) नुसार खरेदी करणे अथवा प्राप्त निविदा नुसार निगोशिएशन करून दिलेल्या दरानुसार खरेदी करणे याबाबत मा.स्थायी समितीचा निर्णय घेवून पुढील कार्यवाही करावी असे निर्देशित केलेले आहे.

तरी वरील आशयाचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- केडगांव प्रभागांसाठी चे पाणी पुरवठा योजने करिता सी .आय. पाईप खरेदी करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत यावा.

त्या प्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.शेख आरिफ शे.र. :- ऑफिस रिपोर्टानुसार कमीचे निविदा दर मंजूर करण्यांत यावे.

मा.उपायुक्त श्री.हांगे साहेब :- मा. सभेने आलेले कमीचे निविदा दर धारक यांनी निगोशिएशन करून दिलेल्या कमीचे दराने किंवा मा. सर्व साधारण सभेने पारित केलेल्या ठरावानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ यांचे मार्फत त्यांचे रेट कॅन्ट्रॅक्ट (हॅन्डलींग चार्जेससह)नुसार खरेदी करणे या विषयी निर्णय घ्यावा.

मा.श्री. शिंदे द.बा. :- आलेले कमीचे निविदा दरास मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- सदर सभेचे कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पहाता सदर प्रकरणी तातडीने पुढील कार्यवाही करण्यांत यावी आलेले कमीचे दर मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :- केडगांव प्रभागांसाठी चे पाणी पुरवठा योजनेकरितां सी.आय. पाईप खरेदी कामी आलेले कमीचे निविदा दर धारक मे. केशारी ॲन्ड कंपनी, मुंबई यांनी निगोशिएशन नंतर कमी करून दिलेल्या कमीचे दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी. सभेचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता सदर प्रकरणी पुढील कार्यवाही तातडीने करण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजने अंतर्गत केडगाव प्रभागांसाठी चे पाणी पुरवठा योजने कामी सी.आय. (C.I) पाईप खरेदी करितां मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता मे.केशारी ॲन्ड कंपनी, मुंबई यांचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दर करार ५% ( पाच टक्के) सेवा शुल्क मिळून येणा-या एकूण रक्कमेपेक्षा ०.१% कमी ( शून्य पूर्णांक एक दशांश टक्के) म्हणजेच ४.९% (चार पूर्णांक नउ दशांश टक्के ) जादाचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. खर्च मंजूर.

सदर विषय पाणी पुरवठयाचा अत्यावश्यक सेवेमधील असल्याने इतिवृत्तही कायम करण्यांस ही सभा मान्यता देत आहे. सदर प्रकरणी पुढील कार्यवाही तातडीने करणेत यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु.

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१३**
सन २००८-२००९

विषय क्रमांक- २ शुक्रवार दिनांक २४/१०/२००८

ठराव क्रमांक - २ शुक्रवार दिनांक २४/१०/२००८

**प्रस्तावाचा विषयः-**अहमदनगर महानगरपालिकेचे **यु.आय.डी.एस.एस.एम.टी.** योजने अंतर्गत केडगाव प्रभागांसाठीचे पाणी पुरवठा योजनेच्या आर.सी.सी., एम.बी.आर. गुरूत्व वाहिनी अंथरणे,जोडणे इत्यादी कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दरास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रस्तावना-विषय- UIDSSMT अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील केडगाव प्रभागासाठी पाणी पुरवठा योजनेच्या आर.सी.सी. एम.बी.आर. गुरूत्व वाहिनी अंथरणे, जोडणे इ. कामाच्या प्राप्त झालेल्या निविदा दरास मा.स्थायी समितीची मंजूरी मिळणे बाबत.

**टिप्पणी :** उपरोक्त विषयास अनुसरून विनंती पूर्वक सादर की , UIDSSMT योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील केडगाव प्रभागासाठी पाणी पुरवठा योजना राबविणेसाठीच्या कामाचे दोन टप्प्यामध्ये वर्गीकरण करून विहीत पध्दतीने वरील कामासाठी वर्तमानपत्रात तिस-यांदा फेर जाहिर टेंडर नोटीस दि. १३/९/२००८ रोजीच्या दैनिक लोकसत्ता व लोकमत मध्ये प्रसिध्द करण्यात येवून निविदा मागविण्यात आलेल्या होत्या.

निविदा स्विकृतीच्या वेळी दि.३/१०/०८ रोजी १) मे.जे.एन. सिंग, कोल्हापूर २) मे.ए.सी. कोठारी, अहमदनगर या दोनही निविदाधारकांनी सादर केलेल्या सिलबंद निविदा दि. ३/१०/०८ रोजी सदर कामासाठीचे PMC महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अहमदनगर या विभागाकडील उपअभियंता, लेखापाल तसेच उपस्थित निविदांधारकां समोर उघडल्या असता स्पर्धात्मक दृष्टया मे.ए. सी. कोठारी, अहमदनगर यांचे सदर कामासाठी दर सर्वात कमीचे परंतू निविदा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ४९.४९ % जास्त आलेले होते.

परंतु सदरचे दर हे जादा व अवाजवी असल्याने कमीच्या निविदाकारास दर कमी करणेच्या दृष्टीकोनातून वाटाघाटी करणेविषयी कळविण्यात आलेले होते. या अनुषंगाने दि.१३/१०/२००८ रोजी मा.आयुक्त व समितीसमोर झालेल्या वाटाघाटीनुसार मे. ए.सी.कोठारी, अहमदनगर यांनी २.२५% दर कमी करून निविदा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ४७.२०%जादा दरानुसार काम करणेस सहमती दर्शविलेली आहे. त्यानुसार कमीचे प्राप्त निविदाधारक मे. ए. सी. कोठारी, अहमदनगर यांची मूळ निविदा व कागदपत्रे आर्थिक तसेच तांत्रिक पडताळणीसाठी PMC महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अहमदनगर. यांचेकडे पाठविण्यात आले होते.

त्यानुसार मे.ए. सी. कोठारी, अहमदनगर यांनी दि.१३/१०/०८रोजी दिलेल्या पत्रानुसार कमी केलेल्या निविदा दराची [४७.२०%जादा] व संपूर्ण कागदपत्रांची म.जि.प्रा.कडून पडताळणी करण्यात आली व त्याबाबतचे त्यांचे पत्र जा.क्र.ले.शा./नी./२६४७/२००८ दि.१५/१०/०८ अन्वये इकडेस प्राप्त झाले आहे. चालू दरसूची सन २००७-२००८ नुसार ठेकेदाराच्या देकाराची रक्कम ही ९.८३% एवढा जास्त दराने येत असले बाबत या पत्रात नमूद केलेले आहेत.

या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबतच्या सादर प्रस्तावामध्ये मा. मुख्य लेखाधिकारी, मा.उपायुक्त, व मा.आयुक्त साहेब यांनी PMC महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,अहमदनगर. यांचे अभिप्रायानुसार UIDSSMT अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील केडगाव प्रभागासाठी पाणी पुरवठा योजने
अंतर्गत आर.सी.सी.एम.बी.आर. गुरूत्व वाहिनी अंथरणे, जोडणे इ. याकामी **मे. ए. सी. कोठारी, अहमदनगर** यांनी निगोशिएशन नुसार कमी करून दिलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ४७.२० % जास्त पंरतू **सन २००७-२००८ च्या दर सूचीनुसार अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ९.८३ % जास्तीचे दरास** मा.स्थायी समितीची मंजूरी घेवून पुढील कार्यवाही करावी असे निर्देशित केलेले आहे.

तरी वरील आशयाच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची मंजूरी मिळावी ही विनंती.

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- केडगांव प्रभागांसाठी चे पाणी पुरवठा योजनेचे आर.सी.सी.,एम.बी.आर गुरूत्व वाहिनी जोडणे, अंथरणे इत्यादी कामी आलेले निविदा दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचुन दाखविण्यांत यावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. तिवारी सु.र.:- सदरचे काम ठेकेदार मुदतीत करणार का? ठरावामध्ये कामाची मुदत टाकण्यात यावी.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- संबंधीत निविदा धारकाशी करण्यांत येणा-या करारनाम्या मध्ये कामाची मुदत टाकलेले असते.

मा.श्री. तिवारी सु.र. :- कामाच्या मुदतीमध्ये काम पुर्ण व्हावे.

मा.श्री. शेख आरिफ शे.र.:-ऑफिस रिपोर्टानुसार आलेले कमीचे दर मंजूर करावे. सदर सभेचे कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पहाता सदर प्रकरणी तातडीने पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

मा.श्री. शिंदे द.बा..:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार आलेले कमीचे दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव:-**अहमदनगर महानगरपालिकेचे यु.आय.डी.एस.एस.एम.टी.योजने अंतर्गत केडगाव प्रभागांसाठी चे पाणी पुरवठा योजनेच्या आर.सी.सी.,एम.बी.आर. गुरूत्व वाहिनी अंथरणे,जोडणे इत्यादी कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता मे. ए.सी. कोठारी,अहमदनगर यांनी निगोशिएशन नुसार कमी करून दिलेल्या अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा ४७.२० %(सत्तेचाळीस पुर्णांक वीस शतांश टक्के) जास्त व सन २००७-२००८ च्या दर सुची नुसार अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा ९.८३%(नउ्र पुर्णांक त्र्याऐंशी शतांश टक्के)जास्तीचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

सदर विषय पाणी पुरवठयाचा अत्यावश्यक सेवेमधील असल्याने इतिवृत्तही कायम करण्यांस ही सभा मान्यता देत आहे. सदर प्रकरणी पुढील कार्यवाही तातडीने करणेत यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन.

अनुमोदक :- मा.श्री.शिंदे दशरथ बाबु.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.